(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९६] २ एस. सी. आर. ९१२

भारत फोर्ज कंपनी लिमिटेड.

– विरुद्ध –

ए. बी. झोडगे आणि अन्य

२० फेब्रुवारी १९९६

[न्यायमूर्ति जी. एन. रे आणि न्यायमूर्ति बी. एल. हंसारिया]

कामगार कायदेः

औद्योगिक विवाद कायदा, १९४७*:*

*एस.११ ए- बडतर्फ करण्याचा आदेश - त्याच्या समर्थनार्थ पुरावा सादर करण्याची नियोक्त्याची विनंती- औद्योगिक न्यायाधिकरणाने फेटाळली- उच्च न्यायालयाने कायम केले- न्याय्य ठरेल की नाही- ग्राह्य धरले - बडतर्फ करण्याच्या आदेशाच्या समर्थनार्थ पुरावा सादर करण्याची नियोक्त्याला संधी नाकारणे न्याय्य नाही- न्यायाधिकरणासमोरची कार्यवाही सहा महिन्यांच्या आत पूर्ण करणे – नियोक्त्याने पुढील पुरावा दोन महिन्यांच्या आत सादर करणे आणि त्यानंतर कामगारांनी एका महिन्याच्या आत पुरावा सादर करणे.*

*वर्कमेन ऑफ मेसर्स फायरस्टोन टायर अँड रबर कंपनी ऑफ इंडिया (पी) लिमिटेड - विरुद्ध - मॅनेजमेण्ट आणि इतर, [१९७३] ३ एस.सी.आर.५८७, शंकर चक्रवर्ती - विरुद्ध - ब्रिटानिया बिस्कीट कंपनी लिमिटेड आणि अन्न.,[१९७९] ३ एस.सी.आर.११६५; वर्कमेन ऑफ मोतीपूर शुगर फॅक्टरी (पी) लिमिटेड - विरुद्ध - मोतीपूर शुगर फॅक्टरी (पी) लिमिटेड, (१९६३) **II** एल.एल.जे. १६३ एस.सी.; स्टेट बँक ऑफ इंडिया - विरुद्ध - ए. के.*

*जैन, (१९७१) **III** एल.एल.जे. ५९९ एस. सी.; दिल्ली क्लॉथ जनरल मिल कंपनी लिमिटेड – विरुद्ध– लुध बुद्ध सिंग, (१९७२) १ एल.एल.जे. १८० एस.सी., चा आधार घेतला.*

मॅनेजमेण्ट ऑफ रिट्झ थिएटर (पी) लिमिटेड - विरुद्ध - इद्व वर्कमेन [१९६३] ३ एस.सी.आर. ४६१) आणि इन रे: कूपर इंजिनिअरिंग लिमिटेड, (१९७५) २ एल.एल.जे. ३७९ एस. सी.,संदर्भित.

दिवाणी अपीलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ४१७८/१९९६

रिट याचिका क्रमांक ५२८१/१९८९ मधील मुंबई उच्च न्यायालयाच्या २.२.९० च्या न्यायनिर्णयावरून आणि आदेशावरून.

जी. बी. पै, ओ. सी. माथूर आणि सुश्री मीरा माथूर. – अपीलकर्त्यांसाठी

मदन जी. फडणीस, सुश्री गुणवंत दारा आणि पी. गौर – उत्तरवादींसाठी

न्यायालयाचा खालील आदेश देण्यात आलाः

अनुमती देण्यात आली.

पक्षांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले. ह्या न्यायालयाच्या विचारार्थ उद्भवणारा संक्षिप्त प्रश्न म्हणजे, अपीलकर्ता कंपनी-नियोक्ता यांनी उत्तरवादी- कर्मचाऱ्याविरुद्ध पारित केलेल्या बडतर्फीच्या आदेशाच्या समर्थनार्थ पुरावा सादर करण्याची याचना औद्योगिक न्यायाधिकरणाने नाकारणे न्याय्य होते की नाही. आक्षेपित निर्णयाद्वारे, मुंबई उच्च न्यायालयाने बडतर्फीच्या आदेशाच्या समर्थनार्थ नियोक्त्याला न्यायाधिकरणासमोर पुरावा सादर करण्याची परवानगी देण्यास नकार देण्याच्या न्यायाधिकरणाच्या निर्णयाला कायम ठेवले आहे.

अपीलकर्त्याची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील श्री. पै यांनी आमच्यासमोर सादर केले आहे की जरी चौकशी योग्यरित्या पार पडली असली तरी अशा चौकशीतील निष्कर्ष विपर्यस्त होते आणि अशा परिस्थितीत पुरावे सादर करण्याची संधी दिली जाऊ नये असे सूचित करून, न्यायाधिकरणाने अशी परवानगी नाकारली आहे. श्री. पै ह्यांच्या मते

असा दृष्टिकोन न्याय्य नाही कारण मॅनेजमेण्ट ऑफ रिट्झ थिएटर (पी) लिमिटेड - विरुद्ध - इद्व वर्कमेन [१९६३] ३ एस.सी.आर. ४६१ मध्ये असे म्हंटले आहे की जरी निष्कर्ष विपर्यस्त असला तरीही (पृष्ठ ४६८ पहा) संपूर्ण मुद्दा तपशीलवार न्यायाधिकरणासमोर आहे आणि विवादाच्या गुणवत्तेप्रमाणे हाताळण्याचा त्याला अधिकार असेल, जेव्हा नियोक्त्याला अतिरिक्त पुरावा सादर करण्यास मोकळीक असेल, तेव्हा उतरवादींची बाजू मांडणारे विद्वान वरिष्ठ वकील श्री.फडणीस असा युक्तिवाद करतात की औद्योगिक विवाद कायद्यात कलम ११ ए समाविष्ट करण्यापूर्वी कायद्यातील ही स्थिती होती, परंतु या कलमाने स्थिती बदलली आहे.

श्री. पै यांचे म्हणणे आहे की हे असे नाही. त्यांच्या वक्तव्याच्या समर्थनार्थ, त्यांनी *वर्कमेन ऑफ मेसर्स फायरस्टोन टायर अँड रबर कंपनी ऑफ इंडिया (पी) लिमिटेड - विरुद्ध - मॅनेजमेण्ट आणि* इतर , [१९७३] ३ एस.सी.आर. पृष्ठ ५८७ मधील या न्यायालयाच्या निर्णयाकडे आमचे लक्ष वेधले आहे. ह्या निर्णयात, कलम ११ ए अंतर्गत कर्मचाऱ्याची सेवासमाप्ती किंवा बडतर्फी करण्याच्या आदेशाचा प्रश्न किंवा अचूकता आणि औचित्य ठरवण्याच्या न्यायाधिकरणाच्या अधिकारावर आणलेले कायदेशीर बदल विचारात घेण्यात आले. या निर्णयात असे सूचित केले गेले आहे की, औद्योगिक विवाद कायद्याच्या कलम ११ए अंतर्गत न्यायाधिकरणाला नियोक्त्याने घेतलेला निर्णय न्याय्य होता की नाही हे ठरवण्यासाठी न्यायाधिकरणासमोर ठेवलेल्या पुराव्यांचे मूल्यांकन करण्याचा अधिकार आहे आणि अशा अधिकारात कोणत्याही प्रकारे बंधने घातली जात नाहीत. या निर्णयात, या न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयांचा देखील विचार करण्यात आला आणि अशा निर्णयांमधून दहा तत्त्वे निवडण्यात आली आहेत. या न्यायालयाने त्याच्या आधीच्या विविध निर्णयांमध्ये मान्यता दिल्यानंतर प्रथमच न्यायाधिकरणासमोर पुरावा सादर करण्याचा नियोक्त्याचा अधिकार, औद्योगिक विवाद कायद्याच्या कलम ११ए द्वारे काढून घेण्यात आला आहे, असा कामगारांच्या वतीने मांडण्यात आलेला युक्तिवादही स्वीकारला गेलेला नाही. ह्या निर्णयात असे सूचित केले गेले आहे की कलम ११ए मध्ये असे कोणतेही संकेत नाहीत की असा अधिकार रद्द करण्यात आला आहे. असे देखील म्हटले गेले आहे की, जर विधिमंडळाचा हेतू अशा अधिकाराचे उच्चाटन असा होता, जो की पूर्वीच्या कलम

११ए मध्ये नमूद केलेल्या निर्णयांमध्ये लक्षात आलेल्या दीर्घ कालावधीपासून मान्यताप्राप्त होता, तर तो वेगळ्या शब्दात मांडला गेला असता. या न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले आहे की, हे सर्वमान्य आहे की त्या संदर्भात कोणतेही स्पष्ट शब्द नाहीत आणि कलम ११ए ने त्या संदर्भात कायद्यात अप्रत्यक्षपणे बदल केला आहे असे कोणतेही संकेत नाहीत. त्यामुळे, नियोक्त्याने कोणतीही चौकशी केली नसली तरी किंवा नियोक्त्याने केलेली चौकशी विपर्यस्त असल्याचे आढळून आले असले तरी, आजही नियोक्त्याला पहिल्यांदाच न्यायाधिकरणासमोर पुरावे सादर करण्याचा अधिकार आहे.

तथापि, श्री. फडणीस यांनी आमच्यासमोर सादर केले आहे की, *फायरस्टोन टायर रबर कंपनीच्या* दाव्यातील निर्णयात, कलम ११ ए च्या परंतुकात विशेष निर्देश देण्यात आले आहे आणि त्यानंतर त्यावर विचार केला गेला आहे असे दिसत नाही. परंतुकात नवीन पुरावा घेण्याबाबतचे स्पष्ट प्रतिबंध आहेत कारण कलम ११ ए च्या परंतुकात असे सूचित होते की कामगार न्यायालय, ई न्यायाधिकरण किंवा राष्ट्रीय न्यायाधिकरण, प्रकरणानुसार, केवळ नोंदवलेल्या सामग्रीचा आधार घेतील आणि या प्रकरणाशी संबंधित नवीन पुरावा घेणार नाही.

श्री. फडणीस ह्यांनी सादर केले आहे की कलम ११ए च्या परंतुकांच्या परिणामाचा विचार करणे म्हणून गरजेचे आहे. श्री.फडणीस यांचा असा युक्तिवाद मात्र स्वीकारला जाऊ शकत नाही. श्री.पै यांनी शंकर चक्रवर्ती - विरुद्ध - ब्रिटानिया बिस्कीट कंपनी लिमिटेड आणि अन्न [१९७९] ३ एस.सी.आर. पृष्ठ ११६५ या प्रकरणातील तीन सदसीय न्यायपीठाने या न्यायालयाच्या नंतरच्या निर्णयाकडे आमचे लक्ष वेधले आहे. या निर्णयात, कलम ११ ए च्या परंतुकाच्या परिणामाचा प्रश्न विशेषतः उपस्थित करण्यात आला होता आणि असा प्रश्न विचारात घेण्यात आला होता. कलम ११ए च्या परंतुका नुसार कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायाधिकरण किंवा राष्ट्रीय न्यायाधिकरण कलम ११ए अंतर्गत कार्यवाही करताना केवळ अभिलेखातील सामग्रीवर अवलंबून राहील आणि विचाराधीन प्रकरणा संबंधित कोणताही नवीन पुरावा घेणार नाही हा युक्तिवाद, फायरस्टोन रबर

कंपनी मधील निर्णयात दर्शविलेल्या तर्कांचा आधार घेत, ह्या न्यायालयाने स्वीकारला नाही.

नैसर्गिक न्यायाचे नियमांचे पालन न केल्याने किंवा विपर्यसामुळे, आस्थापनेतल्या आस्थापनेतील चौकशी निष्फळ ठरू शकते. दूषित चौकशीच्या आधारे केलेली शिस्तभंगाची कारवाई ही, चौकशी न करता शिस्तभंगाच्या कारवाईपेक्षा, वरचढ ठरत नाही. दोन्ही परिस्थितींमध्ये पुरावा सादर करण्याचा नियोक्त्याचा अधिकार सर्वमान्य आहे. या संबंधात, *वर्कमेन ऑफ मोतीपूर शुगर फॅक्टरी* (*पी*) *लिमिटेड - विरुद्ध - मोतीपूर शुगर फॅक्टरी* (*पी*) *लिमिटेड,* **(१९६५)** ***II एल.एल.जे. १६२ एस.सी., स्टेट बँक ऑफ इंडिया - विरुद्ध - आर. के. जैन,*** **(१९७१)** ***III एल.एल.जे. ५९९ एस. सी. दिल्ली क्लॉथ जनरल मिल कंपनी लिमिटेड – विरुद्ध– लुध बुद्ध सिंग,*** **(१९७२)** ***I एल.एल.जे. १८० एस.सी. आणि फायरस्टोन टायर्स कंपनी, प्रकरण*** (वर नमूद केलेले) ह्यांचा संदर्भ घेतल्या जाऊ शकतो. ज्या टप्प्यावर नियोक्त्याने गुणवत्तेनुसार शिस्तभंगाच्या कारवाईचे समर्थन करण्यासाठी अतिरिक्त पुरावा सादर करण्याची परवानगी मागितली पाहिजे हे या न्यायालयाने दिल्ली क्लॉथ अँड जनरल मिलच्या प्रकरणात (वर नमूद केलेले) सूचित केले होते. *शंकर चक्रवर्तीच्या प्रकरणात* (वर नमूद केलेल्या) असा युक्तिवाद आहे की न्यायाधिकरणासमोर येणाऱ्या शिस्तभंगाच्या कारवाईच्या प्रत्येक प्रकरणात, न्यायाधिकरणाने कायद्याची बाब म्हणून प्राथमिक मुद्दा तयार केला पाहिजे आणि चौकशीची वैधता किंवा अन्यथा पाहण्यासाठी पुढे गेले पाहिजे आणि नंतर नियोक्त्याला आरोप कायम ठेवण्यासाठी आणखी पुरावा सादर करण्यासाठीची नव्याने नोटीस बजावली पाहिजे. नियोक्त्याने असे करणे निवडल्यास, *कूपर इंजिनिअरिंग लिमिटेड* (१९७५) २ *एल.एल.जे. ३७९ एस. सी.* च्या प्रकरणात या न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेत, तो स्वीकारला गेला नाही. *दिल्ली क्लॉथ मिलच्या प्रकरणात* (वर नमूद केलेले) व्यक्त केलेले मत की कार्यवाही बंद होण्यापूर्वी, नियोक्त्याने न्यायाधिकरणाकडे अशा संधीसाठी योग्य विनंती केल्यास पुरावा सादर करण्याची संधी दिली जाईल, शंकर चक्रवर्तीच्या खटल्यात हे निरीक्षण नोंदवल्यानंतर पुनरावृत्ती करण्यात आली आहे की पुढील पुरावा सादर करण्यासाठी परवानगी कधी मागायची आहे या प्रश्नावर, *कूपर इंजिनिअरिंग लिमिटेड*

मधील या न्यायालयाच्या निर्णयाने दिल्ली क्लॉथ मिलच्या प्रकरणातील या न्यायालयाचा निर्णय रद्द केला नाही. न्यायाधिकरणासमोरची कार्यवाही बंद होण्यापूर्वी नियोक्त्याने बडतर्फ करण्याच्या आक्षेपार्ह आदेशाच्या समर्थनार्थ पुरावा सादर करण्याची विनंती केली होती, यावर सध्याच्या प्रकरणात कोणताही वाद नाही. त्यामुळे, नोकरीवरून काढून टाकण्याच्या आदेशाच्या समर्थनार्थ न्यायाधिकरणासमोर पुरावा सादर करण्याची नियोक्त्याला संधी नाकारणे न्याय्य ठरत नाही.

या प्रकरणाच्या त्या दृष्टिकोनातून, आक्षेपीत निर्णय कायम केला जाऊ शकत नाही आणि तो रद्द करण्यात येते. पक्षांना औद्योगिक न्यायाधिकरणासमोर योग्य वाटेल असा पुरावा सादर करणे खुले असेल, जेथे या प्रकरणाची पुन्हा सुनावणी होणार आहे. ही कार्यवाही प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असल्याने, आम्ही निर्देश देतो की न्यायाधिकरणासमोरची कार्यवाही शक्य तितक्या लवकर, परंतु हा आदेश जारी केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ न घेता पूर्ण केली जावी. न्यायाधिकरणासमोरच्या कार्यवाहीला गती देण्यासाठी आम्ही निर्देश देतो की अपीलकर्ता भारत फोर्ज लिमिटेड आजपासून दोन महिन्यांच्या आतील कालावधीत उक्त कंपनीला हवे तसे आणखी पुरावे सादर करू शकेल आणि कामगार त्यांची इच्छा असल्यास त्यानंतर एका महिन्याच्या आत पुरावे सादर करू शकतील. त्यानुसार खर्चाबाबत कोणत्याही आदेशा शिवाय अपील निकाली काढले जाते.

अपील निकाली काढण्यात आली.

## अस्वीकरण

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".